PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Gho Mala Asla Hava
Year: 2009

Song: Samindara Re Samindara Re
Lyricist:

समिंदरा रे समिंदरा रे
समिंदरा माझ्या समिंदरा
समिंदरा यारा समिंदरा
भणभणतो भणभणतो तुफान वारा
भणभणतो भणभणतो तुफान वारा
हां समिंदरा यारा समिंदरा
पिरतीच्या माडांचो पाडलो नारळ
पाणी त्याच कधी ग्वाड कधी खारा खारा
पिरतीच्या माडांचो पाडलो नारळ
पाणी त्याच कधी ग्वाड कधी खारा खारा
उठणाऱ्या लाटेला लाल तांबडया वाटेला
उडणाऱ्या पाखराला सुळक्याच्या शिखराला
झुलणाऱ्या माडांना मोहरल्या झाडांना
येते का याद तुझी येते का याद
येते का याद तुझी येते का याद
कोण घाली साद
मला कोणी घाली साद
कोण घाली साद गं
कोण घाली साद

कसं सांगू कशासाठी
धावतूया जीव सैरावैरा
समिंदरा माझ्या समिंदरा
समिंदरा यारा समिंदरा

पिरतीचा डंख करी जीव बेहाल
तरी जीत्याक लागता गो प्यारा प्यारा

पिरतीचा डंख करी जीव बेहाल
तरी जीत्याक लागता गो प्यारा प्यारा
रामा रामा वल्हव रामा
वल्हव वल्हव वल्हव वल्हव रामा रामा
असं कसं मला कधी कळलं बी न्हाय
जीव माझा कुठंतरी गुंतून गेला हाय
ठाऊक कोणाला हे गलत का सही
माघारी तिच्या मला करमत न्हाई
कशी ती असंल मला कधी ती भेटंल
होटावर तिच्या हासू माझंच फुटंल
कशी ती असंल याला कधी ती भेटंल
होटावर तिच्या हासू येचच फुटंल

हे विरबाहू माऊली या अल्ला
हे लपलप पावली या अल्ला
बाळ गोपाळांच्या या अल्ला
हाके गो धावली या अल्ला
गुपित तुझं माझं जसा शिंपल्यात मोती
तुझ्या संगतीनं जातील माझ्या चांद राती
ओहोटीचा उधाणाचा खेळ तुला कळतो सारा
समिंदरा यारा माझ्या
समिंदरा माझ्या यारा
समिंदरा यारा समिंदरा
समिंदरा यारा समिंदरा
समिंदरा माझ्या समिंदरा
समिंदरा यारा समिंदरा
समिंदरा माझ्या समिंदरा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*